// स्त्रीशक्तिस्तुभ्यं नमः //

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, बांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक : ममआ-२०१९/आमुलें/का-०७/833
दिनांक :- २०.०४.२०१९.

प्रति,
मा.पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक यांचे कार्यालय,
जिल्हा-चंद्रपूर.

विषय :-'इन्फंट जिजस सोसायटीच्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या वस्तीगृहातील अल्पवयीन आदिवासी मुलींचे लैंगिक शोषण झाले असल्याच्या तक्रारीबाबत.

महोदया,

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ अंतर्गत कलम १० (१) (फ) (एक) व (दोन) नुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगास स्त्रियांशी निगडित प्रकरणे स्वीकारणे आणि त्या बाबींची स्वाधिकारे दखल घेण्याचे अधिकार प्राप्त करण्यात आले आहेत.

महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयात माननीय श्रीमती शोभा फडणवीस जी, आमदार व माजी मंत्री यांचा विनास्वाक्षरी अर्ज प्राप्त झाला आहे. सदर अर्जामध्ये नमूद बाबीं हया गंभीर स्वरुपाच्या असून, पीडित मुलींची स्थिती अत्यंत नाजूक असून, त्यांच्या बाल मनावर मोठा आघात झाला असून, मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सदर प्रकरणाची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी दैनिक वृत्तपत्रामध्येही बातमी प्रसिध्द झाली असून, सदर बातमीचे कात्रण व तक्रार अर्जाची प्रत आपल्या सुलभ संदर्भार्थ या पत्रासोबत पाठवित आहोत.

अर्जदाराने अर्जात नमूद केले आहे की, सहा.अधिक्षक व वॉर्डन यांचेकडूनच या मुलींचे लैंगिक शोषण होत असून, मुलींना गुंगीचे औषध देवून त्यांचेवर अत्याचार होत होता. सदर घटना ही अत्यंत ऋणास्पद असून, समाजाला काळीमा लावणारी आहे. या प्रकरणी आपण व्यक्तीशः लक्ष घालून सत्यता पडताळून तात्काळ कारवाई करावी असे मा.अध्यक्षांनी सूचित केले आहे.

तरी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आपण व्यक्तीशः लक्ष घालून योग्य ती उचित कार्यवाही करावी, असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिलेले आहेत. यास्तव आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा १९९३ कलम १२(२) व (३) नुसार त्वरित पाठवावा, ही विनंती.

आपली,
आशीसोज्वळ

(आ.शी.सोज्वळ)
प्रशासकीय अधिकारी

सोबत-तक्रार अर्जाची प्रत व वृत्तपत्राचे कात्रण